महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Lokneta News - लोकनेता न्युज

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे
Epaper: www.dainiklokneta.in/
दैनिक लोकनेता
दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.
मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112
dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

शुक्रवार दि.१७ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २४३ किंमत २ रुपये 7499615933

युवकांनी काळानुरूप शिक्षण व कौशल्य संपादन करावे-सहपालकमंत्री ॲड.आशिष जयस्वाल

प्रोजेक्ट 'उडान' अंतर्गत १२७८ युवकांना रोजगार; नियुक्तीपत्र वितरण व ३१ वाहनांचे लोकार्पण

लोकनेता न्यूज नेटवर्क
सेवा पवार । गडचिरोली

आधुनिक युगाच्या बदलत्या गरजेनुसार युवकांनी शिक्षणासोबत तांत्रिक कौशल्य आत्मसात करून स्वतःमध्ये आवश्यक बदल घडवून आणावेत, असे आवाहन राज्याचे सहपालकमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी केले.

गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून प्रोजेक्ट 'उडान' अंतर्गत आयोजित भव्य रोजगार मेळावा व वाहन लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार डॉ मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलम सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमात सहपालकमंत्री जयस्वाल यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात युवकांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच माओवाद विरोधी अभियानासाठी प्राप्त ३१ चारचाकी वाहनांचे लोकार्पणही यावेळी करण्यात आले.सदर रोजगार मेळाव्यात देशातील ३८ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला होता. दुर्गम व अतिदुर्गम भागातील ४ हजारांहून अधिक युवक-युवतींनी नोंदणी केली असून सुमारे २४०० उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहिले. त्यापैकी एकूण १२७८ युवकांना विविध कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून निवड झालेल्या उमेदवारांना वार्षिक सुमारे १ लाख ८० हजार ते ३ लाख ६० हजार रुपयांपर्यंतचे पॅकेज मिळाले आहे.यावेळी मार्गदर्शन करताना सहपालकमंत्री जयस्वाल म्हणाले की, केवळ शिक्षण पुरेसे नसून कौशल्याधारित शिक्षणाची जोड आवश्यक आहे. बदलत्या स्पर्धात्मक युगात युवकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उपलब्ध संधींचा स्वीकार करावा. स्वतःचा विकास साधताना जिल्ह्याच्या प्रगतीतही योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्यात रोजगारनिर्मितीला गती मिळत आहे. विविध उद्योग, खनिज संपत्ती आणि विकास प्रकल्पांमुळे रोजगाराच्या संधी वाढत असून यामुळे जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.आमदार मिलिंद नरोटे यांनी रोजगार मेळाव्याच्या आयोजनाबद्दल पोलीस विभागाचे अभिनंदन करत शासन युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.गडचिरोली पोलीस दलाने माओवाद नियंत्रणासोबतच युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रोजगार व कौशल्य विकासाचे उपक्रम राबविले असून या रोजगार मेळाव्यामुळे दुर्गम भागातील युवकांना नवी दिशा मिळणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमाला बहुसंख्य उमेदवार, पालक व नागरिक उपस्थित होते.

निवडणुकीच्या तोंडावर लोडशेडिंग होत नाही आत्ताच का?-मच्छिंद्र पोटफोडे

लोडशेडींगमुळे खानवटे गावातील ग्रामस्थ हैराण; रास्ता रोको चा इशारा!

लोकनेता न्यूज नेटवर्क
दौंड,पुणे । बबनराव धायतोंडे

खानवटे (ता.दौंड) येथे दररोज सात ते आठ तास वीज गायब होत असून संपूर्ण गाव अंधारात राहत आहे.त्यामुळे गावातील नागरिक अतिशय हैराण झाले असून मे महिन्याच्या कडक उन्हाळ्याच्या अगोदरच विजेच्या लोडशेडिंगला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.सायंकाळी ऐन स्वयंपाक करण्याच्यावेळी आणि जेवणाच्या वेळी वीज नसल्यामुळे रात्री स्वयंपाक आणि जेवण अंधारातच करावे लागत आहे.त्यामुळे महिला देखील या लोडशेडिंग मुळे प्रचंड हैराण झाल्या आहेत. काही ठराविक मुजोर लोकांमुळे संपूर्ण गावाला वेठीस धरणे चुकीचे असल्याचे ग्रामस्थांमध्ये बोलले जात

आहे.लवकरात लवकर खानवटे गावाचे लोडशेडिंग संपूर्ण बंद न केल्यास खानवटे ग्रामस्थांनी भिगवण-राशीन रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

लोकसभा,विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर मतदारांची नाराजी नको व त्याचा मतदानावर थेट परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जाते व अजिबात लोडशेडिंग केले जात नाही.आणि एखदा का निवडणुका संपल्या की सर्वसामान्य जनतेला सतत लोडशेडिंगला सामोरे जावे लागत आहे. ही एक प्रकारे मतदारांची फसवणूक करून ग्रामस्थांवरती मोठा अन्यायच होत आहे.त्यामुळे ग्रामस्थांनी येथून पुढे अतिशय हुशारीने मतदान केले पाहिजे.

-मच्छिंद्र पोटफोडे,मा.सरपंच खानवटे,दौंड.

सिगोडा फाटा येथे ५२ वर्षीय इसमाचे मूर्तदेहशव सापडले

लोकनेता न्यूज नेटवर्क
मांडवी । प्रतिनिधी

किनवट तालुक्यातील सिंगोडा फाटाजवळील पाण्याची कॅनल मध्ये एका ५२ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह शव आढळून आले आहे मृत्य व्यक्तीची ओळख पटली असून सिंगोडा तांडा येथील रहिवासी आहे मांडवी पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे.दि.१५ एप्रिल रोजी सिंगोडा फाटा जवळील कॅनालमध्ये एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळताच सपोनी गंगाधर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पोलिस घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्या ठिकाणी थोडेसे पाणी असलेल्या कॅनालमध्ये एक इसमाचे प्रेत अर्धवट सडलेल्या अवस्थेत आढळून आली पोलिसांनी

अधिक माहिती घेतली असता मयत व्यक्तीचे नाव विष्णू भावराव राठोड

असल्याचे स्पष्ट झाले आहे तो किनवट तालुक्यातील सिंगोडा येथील रहिवासी आहे. जास्त दारु पिण्याच्या सवइ मुळे फिट्स येण्याचा आजारही त्याला होता. घटना घडलेल्या ठिकाणी हा इसम दि.१२ एप्रिल रोजी पाहिल्याचे काही प्रत्यक्षदर्शीचे म्हणणे आहे. या घटनेची नोंद मांडवी पोलीस ठाण्यात करण्यात आले आहे.

न्यायहक्काच्या कामगार धोरणासाठी भारतीय मजदूर संघाचा कामगार आयुक्तालयावर आक्रोश मोर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क
उरण । विठ्ठल ममताबादे

वीज, कृषी, आरोग्य, शिक्षण, महिला, युवा उद्योग अशा विविध धोरणाप्रमाणे मागील अनेक वर्षांपासून आपल्या न्यायहक्कासाठी लढणाऱ्या महाराष्ट्रातील कष्टकरी, श्रमिक कामगारांचे देखील धोरण तयार करून, कंत्राटी कामगारांना कंत्राटदार मुक्त सेवेसाठी हरियाणा पॅटर्न लागू करण्यात यावा यासह विविध मागण्यासाठी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाने आपल्या विविध उद्योगातील कामगारांचा आज मुंबईतील वांद्रे स्थित कामगार आयुक्त कार्यालयावर हजारोंच्या संख्येने धडक आक्रोश मोर्चा आयोजित केला होता, या भव्यदिव्य अशा मोर्चामध्ये घरेलू, बांधकाम, वीज, अंगणवाडी, आशा वर्कर, रिक्षा टॅक्सी चालक, फेरीवाले, विडी कामगार, जलसेवा, गरपालिका, सहकारी बँका, राष्ट्रीय बैंक, पोर्ट ट्रस्ट, रेल्वे, संरक्षण, माथाडी, एसटी महामंडळ, रुग्णालय, टोल आदी आस्थापनातून सुमारे १०,००० कामगार सहभागी झाले होते, कामगार संघटनांच्या या मागण्यांबर तातडीने विचार करू आणि सर्व उद्योगाशी संबंधित मंत्र्यांच्या बैठका मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घेऊन कामगारांचे हे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी दिले शिष्ट मंडळाला दिले.मागील अनेक वर्षांपासून राज्यातील संघटित आणि असंघटित कामगारांच्या न्यायहक्कांच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे. किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, ईएसआय रुग्णालय सेवा, विमा संरक्षण, बोनस आणि उपदान असे अनेक प्रश्न कायम प्रलंबित असून कामगाराची विविध आस्थापनातील मालकांकडून कायम पिळवणूक झालेली आहे. याकडे

सरकारचे लक्ष वेधण्यासाठीच कामगार आयुक्तालयावर या आक्रोश मोर्चाचे आयोजण केले गेले होते. या मोर्चाचे नेतृत्व भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय महामंत्री सुरेंद्र पांडे, प्रदेश अध्यक्ष ऍड.अनिल ढुमणे आणि सरचिटणीस किरण मिलगीर, क्षेत्र संघटक सी व्ही राजेश, बाळासाहेब भुजबळ, हरी चव्हाण यांनी केले.याप्रसंगी परेलू अशा विविध कामगार संघटनांच्या सुरेंद्र पांडे, ऍड अनिल ढुमणे, किरण मिलगीर, सी व्ही राजेश बाळासाहेब भुजबळ, अरुण पिवळ, संदीप कदम, हरी चव्हाण, बाळासाहेब कांबळे, अनिता चव्हाण, ज्योती तावरे, निलेश खरात, सचिन मेंगाळे, अनिल पारधी, सागर पवार, संजन वाडकर, राजेश सिंघ, संजय कांबळे आदींच्या शिष्ट मंडळाने कामगार मंत्री नामदार आकाश फुंडकर यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांची ३२ निवेदन देण्यात आली. या प्रसंगी कामगार आयुक्त हनुमंत तुम्मोड आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. या मागण्यांमध्ये महाराष्ट्रात कामगारांचे धोरण तयार करावे, कंत्राटी कामगारांना हरियाणा पॅटर्न लागू करावा, प्रत्येक जिल्ह्यात कामगार राज्य रुग्णालय सुरु करावे, बांधकाम कामगार मंडळातील भ्रष्टाचाराची चौकशी करावी, आशा आणि अंगणवाडी सेविकांना कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, राज्यातील ईपीएस ९५ पेन्शन धारकांना राज्य सरकाने दरमहा ३००० रुपये द्यावेत, घरेलू मंडळाच्या योजना सुरु कराव्यात, फेरीवाल्यांचे व्यवसाय पुन्हा सुरु करू द्यावे, बँकांना ५ दिवसाचा आठवडा करावा आदी मागण्याचा समावेश होता.

अवैद्य रेती तस्करांवर एलसीबीचा दणका; एक कोटींचा तीन लाख दहा हजार चा मुद्देमाल जप्त

बावनकुळे यांच्या सूचनेनंतर पोलीस ॲक्शन मोडमध्ये; चार ओव्हरलोड डंपर ताब्यात

लोकनेता न्यूज नेटवर्क
अमरावती । प्रतिनिधी

अमरावती ग्रामीण हद्दीत वाढत्या अवैध रेती तस्करीवर लगाम घालण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून चिंचखुर्द-रेडवा मार्गावर स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने मोठी कारवाई करत चार ओव्हरलोड डंपर जप्त केले. या कारवाईत पोलीसांनी ३१ ब्रास रेती आणि चार डंपर असा एकूण एक कोटी ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.अमरावती ग्रामीण हद्दीत वाढत्या रेती चोरीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. एलसीबीचे पथक १२ एप्रिल रोजी गस्त घालत असताना त्यांना चिंचखुर्द-रेडवा मार्गावर काही डंपर विनापरवाना चोरीची रेती वाहतूक करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ नाकाबंदी करून चार डंपर (एमएच २७ डीटी १२१२, एमएच २७ डीटी ४०००, एमएच २७ डीटी ०७८२ आणि एमएच २७ डीटी २५६३) अडवून तपासणी केली. या डंपरमध्ये विनारॉयल्टी ओव्हरलोड रेती आढळून आली.पोलिसांनी चारही वाहनांसह ३ लाख १० हजार रुपये किंमतीची ३१ ब्रास रेती आणि एक कोटी रुपये किंमतीचे चार डंपर असा एकूण मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अचलपूरचे सहाय्यक पोलीस अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पीआय किरण वानखेडे, तसेच त्यांचे

पथक ब्राह्मणवाडा थडी चे ठाणेदार प्रशांत जाधव तसेच पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

तस्करांना अभय?

१) मोर्शी आणि वरुड तालुक्यातून दररोज ४५० हून अधिक ट्रॅक्टर रेतीची अवैध तस्करी होत असल्याची तक्रार चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आली होती.

२) या तक्रारीनंतर बावनकुळे यांनी महिनाभरपूर्वी कारवाईच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. या सूचनेनंतर आता अमरावती ग्रामीण पोलिसांनी ही धडक कारवाई केली आहे.

३) या कारवाईमुळे काही भागातील स्थानिक पोलीस आणि महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त होत आहे.

कारवाईत सहभागी

सचिन जाधव, पो.ना. विशाल रोकडे, अमोलदास मिठाराम ठोंबरे, संतोष तेलंग, निरंजन आमटे, रमेश चांडकपुरे, दीपक पाटील, आकाश भोळे, किशोर सुने आणि चालक तांडे यांनी सहभाग घेतला

महात्मा बसवेश्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्राचा मराठवाड्या मध्ये नावलौकिक-प्रांतपाल रो.सुधीर लातूरे

लोकनेता न्यूज नेटवर्क
लातूर । शिवाजी निरमनाळे

आज संपूर्ण जगामध्ये विविध खेळ प्रकाराला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कुस्ती प्रशिक्षण केंद्राने कुस्ती आणि ज्यूदो खेळामध्ये आपल्या कार्यकुशल कामगिरीने मराठवाड्यामध्ये आपला एक वेगळा नावलौकिक निर्माण केला आहे असे प्रतिपादन रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल रोटेरियन सुधीर लातूरे यांनी बोलताना व्यक्त केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी., क्रीडा विभाग आणि रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ एप्रिल ते १० मे २०२६ या कालावधीमध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या कुस्ती प्रशिक्षण केंद्रामध्ये लातूर जिल्ह्यातील कुस्ती व ज्युदो खेळाडूसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे हे होते तर विचारमंचावर रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल रो.रविशंकर हिंगणे, मुख्य समन्वयक तथा क्रीडा विभाग प्रमुख प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजनचे अध्यक्ष डॉ.गुणवंत बिरादार, सल्लागार समिती सदस्य प्रो.डॉ.संजय गवई, मराठी विभागप्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.घन:श्याम ताडेवाड, प्रोजेक्ट चेअरमन प्रा.आशीष क्षिरसागर आणि रो.निळकंठ स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना सुधीर लातूरे म्हणाले की, भारतीय परंपरेत खेळाला सर्वाधिक महत्त्व आहे. चित्त आणि देह शुद्धीकरिता विविध खेळ प्रकार महत्त्वाचे आहेत. लातूरने अलीकडच्या काळात कुस्तीतही नवा पॅटर्न तयार केला आहे.

यावेळी कुस्ती व ज्यूदो राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केलेल्या कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील करण बिराजदार आणि साईनाथ देवकाते यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार सुद्धा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, कोणत्याही क्रीडा प्रकारात राजकारण न आणता खेळाडूंना सर्व सुविधा पुरवल्या गेल्या पाहिजेत. ओस पडत जाणारी मैदानी पुन्हा नव्याने संजीवनी देऊन सेवा सुविधा पुरवून शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास खेळाला चांगले दिवस येतील असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रो.डॉ.संजय गवई यांनी केले तर आभार डॉ.घन:श्याम ताडेवाड यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.विष्णू तातपुरे, नंदू काजापुरे आणि गुरू बिरादार यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला लातूर जिल्ह्यातील कुस्ती आणि ज्यूदो खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या स्मरणार्थ शौर्य दिन साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क
पाचोड । त्रिसिंग पा जायभाये

शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या स्मरणार्थ 'शौर्य दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. मराठा इतिहासातील अद्वितीय पराक्रम आणि बलिदानाची परंपरा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. भगवान जायभाय उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले.यावेळी बोलताना डॉ. जायभाय यांनी सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्या शौर्यपूर्ण कार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात प्रतापराव गुजर हे अत्यंत धाडसी आणि पराक्रमी सरसेनापती होते. त्यांच्या पराक्रमामुळेच शिवाजी महाराजांनी त्यांना 'सरनोबत' ही पदवी बहाल केली होती. साल्हेरच्या लढाईत त्यांनी मुघल सैन्याचा पराभव करून मराठ्यांचे सामर्थ्य सिद्ध केले. तसेच २४ फेब्रुवारी १६७४ रोजी नेसरीच्या लढाईत अवघ्या सहा मावळ्यांसह बहलोल खानावर हल्ला करून त्यांनी स्वराज्यासाठी बलिदान दिले. या घटनेमुळे वेडात मराठे वीर दौडले सात ही म्हण मराठी इतिहासात अजरामर झाली, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. कोठावळे म्हणाले की, छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात जीवाची बाजी लावणारी माणसे होती. त्यांनी प्राणांची पराकाष्ठा करून स्वराज्य उभारले आणि टिकवले. हिंदवी स्वराज्याच्या इतिहासात अनेक हुतात्म्यांनी आपल्या बलिदानाने स्वराज्याचे रक्षण केले, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्तम जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. हेमंतकुमार जैन यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव डॉ. सुरेश नलावडे डॉ. तुकाराम गावंडे डॉ.सुभाष पोटभरे डॉ. हरिप्रसाद बिडवे प्रा.विनोद कांबळे सतीश वाघ गजानन इंगळे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिग्नल वायर तोडून रेल्वे रोखली; चोरट्यांचा धुमाकूळ

शस्त्राचा धाक दाखवत केली लूटमार मानवत रोड रेल्वे स्टेशन परिसरातील घटना

लोकनेता न्यूज नेटवर्क
मानवत । रमेश मुलगीर



रेल्वे सिग्नलचे वायर तोडून छत्रपती संभाजीनगरहून गुरुवार १६ एप्रिलच्या पहाटे २.५० वाजेच्या सुमारास मानवत रोड रेल्वे स्थानक परिसरात चोरट्यांनी काकीनाडा साई एक्सप्रेस रोखली. चाकू, तलवार आदी शस्त्राचा धाक दाखवत जवळपास सव्वातीन लाखांची लूटमार केली. अंधाराचा फायदा घेत चोरटे पसार झाले.

याबाबत मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, गुरुवार १६ एप्रिलच्या पहाटे २.५० वाजेच्या सुमारास गाडी क्र. १७२०६ काकीनाडा साईनगर रेल्वे एक्सप्रेस मानवत रोड रेल्वेस्थानकात येत होती. काकीनाडा एक्सप्रेस गाडीला मानवत रोड स्टेशन येथे थांबा नाही, मात्र सिग्नल मिळत नसल्याने ब्रीजजवळ रेल्वे थांबली. गाडी थांबताच चोरट्यांनी जनरल व एस ४ या डब्यामध्ये प्रवेश केला. चाकू, तलवारीचा धाक दाखवून महिला प्रवाशांचे दागिने लुटले. रेल्वे सुरक्षा बलाचे जवान घटनास्थळी पोहोचण्यापूर्वी चोरटे पसार झाले. जवळपास सहा दरोडेखोर होते.

मानवत रोड येथे रेल्वे प्रवाशांची सुरक्षा धोक्यातमानवत रोड रेल्वे स्टेशन येथे अशा प्रकारच्या घटना यापूर्वी अनेकदा घडलेल्या आहेत. रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने येथे कायमस्वरूपी रेल्वे पोलीस बल चौकी सुरू करण्याची मागणी अनेकदा करण्यात आली परंतु रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष केले.

आरपीएफच्या जवानांनी चोरट्यांचा पाठलाग केला, मात्र ते पसार होण्यात यशस्वी झाले. घटनेची माहिती मिळताच रेल्वे अधिकारी, कर्मचारी, एपीआय मीना, पोकॉ. पदमाकर मोगरे, डॉगक्वाड, क्राईम शाखेचे अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. सिग्नल यंत्रणेचे केबल वायर दुरुस्त केली. या संपूर्ण घटनाक्रमामुळे एक्सप्रेस तब्बल ४० मिनिटे मानवत रोड स्टेशनवर थांबली. रेल्वे सुरक्षा बलाचे पोउपनि. दिलीप कांबळे व जीआरपी सपोनि. शैलेश जोगदंड यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.

पाण्यासाठी वणवण; वाड्यात ४० गावांचा संताप उसळला-२० एप्रिलला 'हंडा मोर्चा'चा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क
पालघर । श्री तुषार भोईर

पालघर जिल्ह्यात वाडा तालुक्यातील सुमारे ४० गावपाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिक अक्षरशः पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या शोधात महिलांना दररोज अनेक किलोमीटर अंतर पार करावे लागत असून, उन्हाच्या तीव्रतेमुळे त्यांचे हाल अधिकच वाढले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष भरत जाधव व तालुका सचिव सुरज दळवी यांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.गंभीर समस्येकडे प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. श्रमजीवी संघटनेने यापूर्वीही अनेक वेळा लेखी निवेदने देऊन तसेच बैठका घेऊन पाणीटंचाईचा प्रश्न मांडला होता. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असला, तरी तो अत्यंत अपुरा आणि अनियमित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक गावपाड्यांपर्यंत टँकर पोहोचत नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे.

विशेषतः महिलांना आणि मुलांना पाण्यासाठी दररोज वणवण भटकावे लागत असून, त्यांच्या आरोग्यावरही याचा विपरीत परिणाम होत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत चालली आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूप धारण करत असतानाही प्रशासनाकडून अपेक्षित गतीने उपाययोजना होत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

सर्व पाणीटंचाईग्रस्त गावपाड्यांमध्ये तात्काळ आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करणे, टँकरची योग्य व नियोजनबद्ध व्यवस्था करणे, प्रलंबित बोअरवेलची कामे तातडीने पूर्ण करणे तसेच नळपाणी योजनांची कामे वेगाने सुरू करून निश्चित कालावधीत पूर्ण करणे यांचा समावेश आहे.संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर या मागण्यांची तात्काळ पूर्तता झाली नाही, तर २० एप्रिल २०२६ रोजी पंचायत समिती वाडा येथे 'हंडा मोर्चा' काढून तीव्र आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने महिला सहभागी होणार असल्याची शक्यता आहे. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

सध्या तरी प्रशासन या गंभीर प्रश्नावर कितपत तत्काळ आणि प्रभावी पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हरिभक्त परायण केशवराव पवळे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्यानिमित्त २५० हून अधिक गावांना विना व गाथा भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क
नायगाव । प्रतिनिधी

नांदेडच्या नायगाव नरसी येथील ग्रामपंचायत अधिकारी ह भ प श्री केशव आनंदराव पवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये नरसी शिवकृपा मंगल कार्यालयात संपन्न झाला कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज ह भ प पुंडलिक महाराजांच्या सुश्राव्य अशा कीर्तनाने झाली यानिमित्ताने हरिभक्त परायण ग्रामपंचायत अधिकारी केशवराव पवळे ज्या गावात आपली सेवा त्या गावांना एक विना गाथा भेट दिली कार्यक्रमासाठी नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र चव्हाण देहू संस्थानाचे सदस्य भाजपाचे श्रावण पाटील भिलवडे ,शिवराज पाटील , भास्कर पाटील भिलवंडे, उद्योजक श्री राहुल पाटील नकाते माणिकराव लोहगावे श्री युवा उद्योजक भास्कर कोकणे नरसीकर तसेच भंडारा डोंगर प्रासादिक दिंडी क्रमांक २१ हावेली पुणे सर्व मान्यवर, बेटकबिलोलीकर मारवाडी कोपरा नायगाव बेटकबिलोली यास अनेक गावातील नागरिक भाविक भक्त टाळकरी माळकरी कीर्तनकार प्रवचन मोठ्या संख्येने उपस्थित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री नकाते सर यांनी केले तर आभार ग्रामपंचायत अधिकारी मुदखेडे साहेब यांनी केले कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं दिमागदार सेवापूर्ती गौरव सोहळ्याच्या निमित्ताने परिसर झाले होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार युवा पिढीने नवनवीन कौशल्य आत्मसात करावे-माजी मंत्री हर्षवर्धन पाटील

लोकनेता न्यूज नेटवर्क
इंदापूर(पुणे) । अनिल खाडे

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा महाविद्यालयाच्या शाहीर अमर शेख सभागृहामध्ये पार पडला यावेळी बोलताना राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी वरील मत व्यक्त केले. यावेळी पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे उपस्थित होते.हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले असून विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्य आत्मसात केली पाहिजे. विविध भाषा, तंत्रज्ञान आणि संशोधन वृत्ती जोपासणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे म्हणाले की,' आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गरजा ओळखून कौशल्यधिष्ठित विद्यार्थी होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड विद्यापीठ विद्यार्थ्यांना जागतिक संधी उपलब्ध करून देत आहे.एआय भीती नसून ती एक संधी आहे.

यावेळी शैक्षणिक, कला, क्रीडा व इतर क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी संस्थेचे सचिव ड. मनोहर चौधरी, संस्थेचे संचालक विलासराव वाघमोडे, तुकाराम जाधव, सुरेश मेहेर, पराग जाधव तसेच इंदापूर अर्बन बँकेचे संचालक मच्छिंद्र शेटे, निराभिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजकुमार जाधव उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांनी केले.

पुरस्काराचे वाचन कला विभागाचे प्रमुख डॉ. भरत भुजबळ, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सदाशिव उबंरदंड, डॉ. राजाराम गावडे, डॉ. बाळासाहेब काळे, कनिष्ठ विभागाचे क्रीडाशिक्षक प्रा. बापू घोगरे यांनी केले.

विद्यापीठ व महाविद्यालय गीत प्राध्यापिका स्वाती राऊत यांनी गायले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिदास भांगे यांनी केले. तर आभार विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांनी मानले.

आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा'; आ.बाबुराव कदम साहेब यांच्या पुढाकाराने कामारी येथे १९ एप्रिल रोजी भव्य आरोग्य महाशिबिर

लोकनेता न्यूज नेटवर्क
हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर

हदगाव/हिमायतनगर तालुक्यातील
मोफत तपासणी, औषधोपचार आणि शस्त्रक्रियेसह वाहतुकीचीही सोय; गरजू रुग्णांना मिळणार दिलासा

आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य समोर ठेवून, ग्रामीण भागातील गरजू आणि वंचित रुग्णांना उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार ✻बाबुराव कदम कोहळीकर साहेब यांच्या पुढाकाराने एका भव्य आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिर रविवार, ✻✻दिनांक १९ एप्रिल✻ रोजी हिमायतनगर तालुक्यातील कामरी येथे पार पडणार आहे.हे शिबिर आमदार बाबुराव कदम कोहळीकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ✻आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे)✻ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील हजारो रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून थेट सेवा मिळणार आहे.

मिळणाऱ्या आरोग्य सुविधा:
शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजारांची मोफत तपासणी करून औषधोपचार केले जातील. विशेष म्हणजे, ज्या रुग्णांना पुढील उपचारांची किंवा शस्त्रक्रियेची आवश्यकता असेल, त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत.

शिबिरात खालील विभागांतील तज्ज्ञ सेवा देतील:
नेत्ररोग: मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया.
अस्थिरोग:✻ सांधेदुखी, मणक्याचे आजार, हाडांचे विकार व फॅक्चर.
स्त्रीरोग:महिलांच्या समस्या, गर्भाशयाचे आजार व वंध्यत्व निवारण.
हृदयरोग व मेडिसिन- मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार व जुनाट आजार.
बालरोग: मुलांचे आरोग्य व कुपोषण समस्या.

रुग्णांसाठी मोफत सोयी-सुविधा:✻✻
शिबिरातून पुढील उपचारासाठी भरती होणाऱ्या रुग्णांसाठी खाट, औषधे आणि जेवणाची संपूर्ण मोफत सोय करण्यात आली आहे. तसेच, रुग्णांना हॉस्पिटलपर्यंत जाण्या-येण्यासाठी ✻मोफत वाहतूक व्यवस्था✻ देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे, जेणेकरून दुर्गम भागातील रुग्णांना कोणताही त्रास होऊ नये.

महत्वाची माहिती व आवाहन
स्थळ: जिल्हा परिषद शाळा, कामारी, ता. हिमायतनगर.
आवश्यक कागदपत्रे: रुग्णांनी येताना आपले मूळ ओळखपत्र (उदा. रेशन कार्ड, आयुष्मान भारत कार्ड इ.) आधार कार्ड! सोबत आणणे अनिवार्य आहे.

हदगाव आणि हिमायतनगर परिसरातील सर्व गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार बाबुराव पाटील कदम साहेब यांच्या व युवा सेनेचे नेते दिगाबर शिरफुले वतीने करण्यात आले आहे. या शिबिरामुळे आरोग्य सुविधांपासून वंचित असलेल्या सर्वसामान्यांना मोठा आधार मिळणार आहे.

उदगीरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन;चार विविध गुन्ह्यांत डीजे मालक व मंडळांच्या अध्यक्षांवर कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क
उदगीर । एल पी उगीले

शहरात उत्साहात साजरी करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती मिरवणुकी दरम्यान प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजवल्याप्रकरणी उदगीर शहर पोलीस ठाण्यात चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी लातूर यांनी ध्वनी प्रदूषणाबाबत जारी केलेल्या आदेशांची पायमल्ली केल्यामुळे पोलिसांनी ही कडक कारवाई केली आहे.१४ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास शहरातील कॉर्नर चौक आणि पत्तेवार चौक परिसरातून निघालेल्या विविध मंडळांच्या मिरवणुकीत ट्रॅक्टरला डीजे लावून मोठ्या आवाजात गाणी लावली होती. पोलीस पथकाने घटनास्थळी तपासणी केली असता, डीजेचा आवाज प्रशासनाने ठरवून दिलेल्या विहित डेसिबल मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. वारंवार सूचना देऊनही लोकसेवकांच्या आदेशाची अवहेलना केल्यामुळे आणि सार्वजनिक उपद्रव निर्माण केल्यामुळे या मिरवणूक मंडळांचे अध्यक्ष आणि डीजे चालक यांच्यावर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.या कारवाईत पोलिसांनी धीरज वाघमारे, शकील शेख, वाजिद शेख, रूपेश खादीवाले, महेश सूर्यवंशी, प्रेम गायकवाड, गजानन पवार, माधव मेघे आणि पृथ्वीराज देवनाळे यांच्यासह अन्य संबंधितांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३, २९२ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५, १३६ नुसार गुन्हे दाखल केले आहेत. पोलीस हवालदार अनिल घोडके, रवींद्र काळे, अक्षय मंडलापुरे आणि निखील बुकटे यांनी याप्रकरणी फिर्यादी दिल्या आहेत. गुन्ह्यात वापरलेले ट्रॅक्टर आणि ध्वनीक्षेपक यंत्रणांबाबतचा तपास सुरू असून, पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवली जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाने केले होते, मात्र नियमांचे उल्लंघन झाल्याने ही कारवाई करण्यात आली.

जिल्हा परीषद वर स्वीकृत सदस्यांची निवड कधी होणार?
अनेक इच्छुकांनी स्वीकृत सदस्यासाठी लावली फिल्डिंग तर अनेकांच्या गुडघ्याला बाशिंग

लोकनेता न्यूज नेटवर्क
जीवन जाधव । औसा

जिल्हा परिषदेवर स्वीकृत सदस्य निवडीची घोषणा राज्य सरकारने केली मात्र ,अजून निवडीचा कार्यक्रम न लागल्याने इच्छुकात अस्वस्थता पसरली आहे , अनेक इच्छुक आपल्या नेत्यांकडे फिल्डींग लावून बसले आहेत ,राज्य सरकारने अजून अध्यादेश न काढल्याने जिल्हा परिषद जिल्हा परीषद सदस्य निवड पातळीवर सध्या शांतता दिसत आहे,परीषदेकडुन अध्यादेश आल्यानंतरच कार्यवाही सुरू होईल अशी चर्चा आहे ,ज्या उमेदवारांना मागून ही उमेदवारी मिळाली नाही अशा नाराज उमेदवारांना स्विकृत सदस्य म्हणून सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून स्विकृत सदस्य म्हणून संधी दिली जाऊ शकते अशी जोरदार चर्चा असुन ,राज्य सरकारने अध्यादेश न काढल्याने स्वीकृत सदस्य निवडीबाबत सध्या वातावरण शांत दिसत आहे, जिल्हा परिषदेच्या सूत्रांनी सांगितले की सरकारकडूनच अध्यादेश न आल्याने आम्ही शांत आहोत, अध्यादेश आल्यानंतर स्वीकृत सदस्यांची निवड होईल ,जिल्हा परिषदेत १०% प्रमाणे सहा सदस्य स्वीकृत म्हणून येऊ शकतात त्यामुळे सदस्य संख्येच्या बेरजेवरुन कोणाचे किती स्वीकृत सदस्य हे ठरेल, स्वीकृत सदस्य आले तर सदस्य संख्या आणखी वाढणार आहे, जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्याचा प्रयोग पहिल्यांदाच होत आहे, त्यामुळे ईच्छुकांची संख्या सुद्धा मोठी असणार आहे, जिल्हा परिषदेतील सत्ताधारी आणि विरोधक कोण कोणाला न्याय देणार हे निवडीनंतरच समोर येणार आहे, सध्या जिल्हा परिषदेत आलेल्या नव्या कारभाऱ्यांनी कारभार पाहणे सुरू केले आहे, सभापतीच्या दालनाची सध्या दुरुस्ती फर्निचर ,फर्निचर करणे सुरू आहे त्यामुळे पदाधिकाऱ्यांना बसण्यासाठी त्यांची दालने खुली नाहीत, अध्यक्ष उपाध्यक्षांची दालने सुस्थितीत आहेत तर ईतर पदाधिकाऱ्यांची दालने सुस्थितीत करण्याचे काम सुरू आहे

सार्थक चंद्रशेखर शिंदे ला सी बी एस सी बोर्ड परीक्षेत ९६.६ टक्के

लोकनेता न्यूज नेटवर्क
लातूर । शिवाजी निरमनाळे



येथील श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थी सार्थक चंद्रशेखर शिंदे याने दहावी सी. बी. एस. सी.बोर्ड परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ९६.६ टक्के घेत घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल वडील ड चंद्रशेखर बजरंग शिंदे, डॉ चैत्राली शिंदे,आई आशा शिंदे,आजोबा बजरंग रामचंद्र शिंदे पाटील कळमगावकर तसेच वर्गशिक्षक जगदाळे सर, मकरंद सर, आणि शाळेतील सर्व शिक्षक, नगरसेवक प्रवीण कस्तूरे, मा.नगरसेवक पुनित पाटील , नगरसेवक ड. दिपक मठपती यांनी त्याचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

चिमूरच्या कापसाचा जागतिक डंका! बांगलादेशात थेट निर्यात,गुजरातलाही मागे टाकलं!

धानपट्ट्यातून 'कापूस क्रांती'; चिमूरच्या शेतकऱ्यांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दमदार एन्ट्री

लोकनेता न्यूज नेटवर्क
चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे

एकेकाळी केवळ 'धानपट्टा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिमूर तालुक्यात आता कापसाची अभूतपूर्व क्रांती घडताना दिसत आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञान, सिंचन सुविधा आणि बदलत्या हवामानाचा अचूक अंदाज घेत शेतकऱ्यांनी कापूस उत्पादनात मोठी झेप घेतली आहे.

चिमूर, वरोरा आणि उमरेड तालुक्यातील कापूस आता आंतरराष्ट्रीय दर्जाचा ठरत असून, बांगलादेशात थेट निर्यात सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, कापसाच्या गुणवत्तेत चिमूरने गुजरातलाही मागे टाकत बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

स्थानिक जिनिंग उद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करून त्यावर प्रक्रिया केली जात आहे. या प्रक्रियेमुळे कापसाच्या गाठी तयार होऊन मोठ्या प्रमाणात निर्यात केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत अनेक ट्रक कापूस बांगलादेशात पाठवण्यात आले आहेत. या वाढत्या मागणीमुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पारंपरिक धान शेती सोडून कापूस उत्पादनाकडे मोठा कल वाढताना दिसत आहे. सिंचन सुविधा आणि आधुनिक पद्धतींमुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे.

तज्ज्ञांच्या मते, चिमूरच्या कापसाचा धागा मजबूत, लांब व उच्च दर्जाचा असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला मोठी मागणी आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

फक्कड मल्हारी खराडे यांच निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क
शेळगाव । राहुल जाधव

शेळगाव(ता.इंदापूर) दि. १६ येथील प्रगतशील शेतकरी फक्कड मल्हारी खराडे वय ५८ यांचे बुधवार दि १५ रोजी मध्यरात्री निधन झाले.
त्याचे मागे पत्नी,एक मुलगा,सून,एक मुलगी,जावई,दोन भाऊ,भावजया,पुतणे,पुतण्या,नातवंडे असा मोठा परिवार आहे.
शेळगाव येथील प्रगतशील शेतकरी लक्ष्मण खराडे व ज्ञानदेव खराडे यांचे ते बंधू तर युवा सामाजिक कार्यकर्ता महेश खराडे यांचे ते वडील तसेच महाराष्ट्र राज्य विक्रीकर निरीक्षक कुलदीप खराडे यांचे ते चुलते तर पत्रकार संतोष ननवरे यांचे ते चुलत सासरे होत.

चार दिवसात चार अंशांची वाढ तापमान पोहचले ४१ अंशावर
नागरिकांनी काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क
किनवट । शेख शौकत



तालुक्याच्या ग्रामीण भागातील शेतमजूर, बांधकाम मजूर तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत आहे. त्यामुळे दुपारच्या कडक उन्हात काम टाळणे, भरपूर पाणी पिणे, डोक्यावर संरक्षण ठेवणे आदी उपाययोजना करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तालुक्यात उष्णतेची तीव्रता
दिवसेंदिवस वाढत असून एप्रिलच्या सुरुवातीलाच उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. मार्चच्या अखेरीस तापमानात वाढ सुरू झाली होती. त्यानंतर काही दिवस हलक्या पावसामुळे व ढगाळ वातावरणामुळे सकाळ-संध्याकाळ थोडा गारवा निर्माणझाला होता. मात्र गेल्या चार दिवसांपासून आकाश निरभ्र झाल्याने तापमानात झपाट्याने वाढ होत आहे.

चार दिवसांपूर्वी ३६ अंश सेल्सिअस असलेले तापमान दररोज सुमारे एक अंशाने वाढत जाऊन शनिवारी ४०.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. आज
(रविवार) वर्ध्यात कमाल तापमान सुमारे ४१ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले जाण्याची शक्यता असून उष्णतेची लाट (हीटवेव्ह) अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. सतत वाढणाऱ्या तापमानामुळे नागरिकांनी आवश्यकती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाने केले आहे. मार्च महिन्यातच तापमानाने ४० अंशांचा टप्पा पार केला होता. एप्रिलच्या अखेरीस आणि मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता असून उष्ण वाऱ्यांमुळे उन्हाची तीव्रता अधिक जाणवत आहे. सूर्यकिरणे अंगावर पडताच चटका बसत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दारव्हा तालुक्यातील लहानशा पळशी गावात भीम जयंतीचा जल्लोष

लोकनेता न्यूज नेटवर्क
किशोर की. कांबळे । दारव्हा

दारव्हा तालुक्यातील २ किलोमीटर अंतरावर असलेले पळशी गाव कोणत्याही महापुरुषांच्या जयंतीच्या उपक्रमात जिल्ह्यात अग्रेसर ओळखल्या जाते. तर काल दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता बुद्ध वंदना व पंचशील त्रिशरण बहुसंख्येने उपस्थित राहून २२ प्रतिज्ञाचा ग्रहण करण्यात आले. व लहान मुलींचे सुंदर असे भीम गीत गायन करण्यात आले. त्याचबरोबर ग्रामपंचायत चे सरपंच दत्ताभाऊ देशमुख यांच्या हस्ते महामानवांना पुष्प माला अर्पण केले. ग्रामपंचायतचे उपसरपंच माननीय वाजित भाई यांच्या हस्ते सुद्धा पुष्य मला अर्पण करण्यात आले. व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पत्रकार किशोर कांबळे यांचे हस्ते पुष्प माला अर्पण करण्यात आले सदर या कार्यक्रमात गजेंद्रभाउ कांबळे उपसरपंच. संतोष भाऊ खंडारे ग्रामपंचायत सदस्य. अमोल खंडारे. दिनेश जाधव. देवानंद मुदाने. चंद्रशेखर बर्डे. आकाश कांबळे. प्रवीण बर्डे युवराज कांबळे. सतीश सावळे. शुभम खंडारे. यश इंगळे.व महिलांच्या हस्ते सुद्धा बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन देण्यात आले सायंकाळी पाच वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची महिलांच्या मोठ्या संख्येने उपस्थित राहून व उत्साह पूर्ण भव्य दिव्य अभिवादन रॅली निघून संपूर्ण पळशी गावात मुख्य मार्गाने मार्गक्रम करत. तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ समारोप करण्यात आला. गावातील सर्व लोकांनी सहकार्य व जागोजागी पाणी वाटप तथा ग्रामपंचायतने सुद्धा मोलाचे सहकार्य केले. व पोलीस यंत्रणांनी सहकार्याची भावना व्यक्त केली तसेच सर्व पंचशील मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आहोरात्र अथक परिश्रम घेऊन हा उपक्रम शांतते त पार पाडले

माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांची उपजिल्हा रुग्णालयाला भेट; रुग्णांशी साधला थेट संवाद

लोकनेता न्यूज नेटवर्क
सेवा पवार। गडचिरोली

अहेरी इस्टेटचे राजे तथा माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी अहेरी येथील उपजिल्हा रुग्णालयाला अचानक भेट देत आरोग्य व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णांशी थेट संवाद साधत त्यांच्या तब्येतीची आत्मीयतेने विचारपूस केली, तसेच रुग्णांना मिळणाऱ्या उपचारांबाबत समाधान जाणून घेतले.

माजी राज्यमंत्री अम्ब्रिशराव आत्राम यांनी रुग्णालयातील विविध विभागांची पाहणी करत औषधांचा पुरवठा, उपलब्ध वैद्यकीय सुविधा, तसेच रुग्णांसाठी असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांची तपासणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी चर्चा करून रुग्णालयातील कामकाजाची सविस्तर माहिती घेतली.

अहेरी उपजिल्हा रुग्णालय हे परिसरातील पाचही तालुक्यांतील रुग्णांसाठी प्रमुख आरोग्य केंद्र असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. त्यामुळे सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी प्रशासनाने अधिक दक्षता घ्यावी, अशा सूचना राजेंनी यावेळी दिल्या.तसेच, रुग्णांना वेळेवर व दर्जेदार उपचार मिळणे हीच खरी सेवा असून, आरोग्य यंत्रणेने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्यात याव्यात, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी सूचनाही दिल्या. राजेंच्या या अचानक भेटीमुळे रुग्णालय प्रशासनात चांगलीच हालचाल निर्माण झाली असून, आरोग्य सेवेत सुधारणा करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.प्रसंगी कुमार अवधेशरावबाबा आत्राम,तालुका अध्यक्ष विकास तोडसाम यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेळगाव येथे महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी; गुणवंतांचा सन्मान अन् महिलांना पैठणीचा आहेर

लोकनेता न्यूज नेटवर्क
शेळगाव । राहुल जाधव

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथे शनिवार, ११ एप्रिल रोजी 'महात्मा फुले उत्सव समिती' व ग्रामस्थांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दिवसाची सुरुवात श्री संत मुक्ताबाई सांस्कृतिक व्यासपीठ येथे महात्मा फुले यांच्या प्रतिमेच्या पूजन आणि अभिवादनाने झाली. सायंकाळच्या सत्रात गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा आणि उच्च पदावर नियुक्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करून नवीन पिढीसमोर एक आदर्श ठेवण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते प्रमुख व्याख्याते गणेश शिंदे यांचे व्याख्यान. त्यांनी महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनसंघर्षावर प्रकाश टाकला. स्त्री शिक्षण आणि समाजसुधारणेसाठी या दांपत्याने सोसलेले कष्ट आजही समाजाला प्रेरणादायी आहेत, असे विचार त्यांनी मांडले.महिलांसाठी या निमित्ताने 'लकी ड्रॉ'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लॉटरी पद्धतीने २१ महिलांची 'सावित्रीची लेक' म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांना मानाची पैठणी साडी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.हा सोहळा यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले उत्सव समिती, स्थानिक शाळा आणि शेळगावच्या ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. या भरगच्च कार्यक्रमांमुळे शेळगावमध्ये विचारांची जपणूक आणि आनंदाचा उत्सव असा दुहेरी संगम पाहायला मिळाला.

प्रामाणिक शेतकऱ्यांवर अन्याय थांबवा;नियमित कर्जफेड करणाऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या!-संभाजी ब्रिगेडचा सरकारला थेट इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क
देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर

राज्यात कर्जमाफीच्या नावाखाली सुरू असलेल्या अन्यायकारक धोरणांविरोधात संभाजी ब्रिगेडने आक्रमक भूमिका घेतली असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष जेजेराव पाटील शिंदे यांनी स्पष्ट शब्दांत सरकारवर टीका करत म्हटले की, जे शेतकरी प्रामाणिकपणे कर्ज फेडतात त्यांनाच शिक्षा आणि जे थकबाकीदार आहेत त्यांनाच बक्षीस - हे धोरण सरळ अन्यायकारक आहे.

नांदेड जिल्ह्यातील शेतकरी नैसर्गिक आपत्ती, शेतीमालाला मिळणारा कमी दर आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा कठीण परिस्थितीतही अनेक शेतकरी कर्ज वेळेवर फेडत आहेत.

मात्र शासनाच्या कर्जमाफी योजनांमध्ये त्यांना डावलले जात असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

संभाजी ब्रिगेडच्या ठळक मागण्या

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी लागू करावी

किमान २ लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तात्काळ जाहीर करावे

बँक व सोसायटी कर्जातून शेतकऱ्यांना त्वरित दिलासा द्यावा

नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे

संभाजी ब्रिगेडने इशारा दिला आहे की, जर शासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील.

शेतकऱ्यांचा अपमान सहन केला जाणार नाही - आता निर्णय घ्या, नाहीतर आंदोलनाला सामोरे जा! शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात..

- जेजेराव पाटील शिंदे
जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, नांदेड

चिखली तालुक्यातील रस्त्यांना नव संजीवनी

लोकनेता न्यूज नेटवर्क
नवलसिंग इंगळे । चिखली

शेतकरी आणि शेत रस्ता हे समीकरण जणू एकमेकांवर अवलंबून आहे आजच्या आधुनिक युगामध्ये उत्तम शेती करायची असेल तर त्यासोबत उत्तम शेतरसते सुद्धा लागतील याची जाणीव चिखली विधानसभा मतदारसंघातील लोकनेत्या विकास कन्या आमदार सौ श्वेता ताई महाले यांना झाली आणि त्यांनी चिखली विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी मजबूत रस्ते मिळाले पाहिजे या भावनेतून मातोश्री शेत पांदन रस्ते योजनेअंतर्गत अनेक गावांमध्ये शेत रस्ते बनवण्यास सुरुवात केली आज चिखली विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमधे मातोश्री पांदन रस्ते अंतर्गत शेत रस्ते तयार झाले आहेत त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतीसाठी या शेत रस्त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांना मजबूत शेत रस्ते मिळाले पाहिजेत हा दूरदृष्टी कोण आमदार श्वेता ताई यांचा आहे यानंतर राहिलेले अनेक शेत रस्ते सुद्धा बळीराजा पांधण रस्ते अंतर्गत पूर्ण करण्याचा मानस त्यांचा आहे.

भीम प्रतिष्ठान हदगाव च्या वतीने(शैक्षणिक साहित्य) पेन वह्या वाटुन १३५ वी भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क
हदगांव । चंद्रकांत भोरे

भीम प्रतिष्ठान हदगाव च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक हदगांव येथे दिनांक १४ एप्रिल रोजी वैचारिक पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश देणाऱ्या महामानवाची जयंती भीम प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना(शैक्षणिक साहित्य) पेन - वह्याचे वाटप करून साजरी करण्यात आली.भिम टायगर सेनेचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय दादासाहेब शेळके यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना (शैक्षणिक साहित्य) पेन - वह्या वाटप केल्या. यानंतर भिमशाहीर संग्राम कीर्तने यांचा भीम गितांचा भव्य असा कार्यक्रम पार पडला. हदगांव, हिमायतनगर चे लोकप्रिय आमदार बाबुरावजी कदम कोहळीकर साहेब यांनी सुध्दा उपस्थित राहुन बुध्दांच्या व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करून शुभेच्छा दिल्या. हदगांव पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक दिघे साहेब यांनी सुध्दा उपस्थिती दर्शविली.



यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भीम प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदिप भाऊ दवणे, उपाध्यक्ष मारोतराव काकडे, सचिव चंद्रकांत भोरे, कार्याध्यक्ष महेंद्र भाऊ धोंगडे, पदाधिकारी साहेबराव नरवाडे अंबाळकर, राष्ट्रदिप वाढवे, जनार्दन हाटकर, व समता सैनिक दलाचे बांधव,व भारतीय बौद्ध महासभा महिला तालुका अध्यक्ष पोर्णिमा ताई सावते, बौध्दाचार्य गौतमराव काळबांडे, कचरू वाढवे,व नगरसेवक श्री.काळबांडे,श्री.रोकडे,किशोर भाऊ भोस्कर, नरवाडे ताई, राहुल भोळे,सामाजिक कार्यकर्ते माधवराव मुनेश्वर,शिंघम ढगे,विशाल नरवाडे,अभय वाठोरे,राष्ट्रपालदादा सावतकर, बौद्धांचार्य भिमशाहीर शिंगणकर, एडवोकेट अतुल चौरे,अँड. स्वरूपाताई भोसले (चौरे), धम्मबंधु कदम, गुलाबराव दवणे आदी उपस्थित होते.यावेळी बबनराव भालेराव यांनी सुरेख असे सुत्रसंचलन केले.

महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती भीम प्रतिष्ठान हदगाव च्या वतीने (शैक्षणिक साहित्य)वह्या -पेनीचे वाटप करून साजरी केली.हया उपक्रमाने मी भारावून गेलो. सर्व कमिटीचे अभिनंदन व भीम जयंती च्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा. यापुढे दरवर्षी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करावा यासाठी माझे पूर्ण सहकार्य राहील.

-दादासाहेब शेळके
भीम टायगर सेना राष्ट्रीय अध्यक्ष

घरफोडी करणाऱ्या दोन आरोपींना अटक, वाडा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क
पालघर । श्री तुषार भोईर

वाडा-वाडा तालुक्यात दिनांक २८/०३/२०२६ रोजी फिर्यादी नरेश काशिनाथ पाटील,रा. देवघर, ता. वाडा हे त्यांच्या नातेवाईकांकडे धार्मिक कार्यक्रमासाठी गेले होते. ते घरी परत आले त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या बंद दरवाजाचे लॉक तोडुन घराच्या बेडरूममधील लाकडी कपाटामध्ये ठेवलेले एकूण २,१६,०००/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने चोरुन नेल्याबाबत वाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं १२२/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५, ३३१(३), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवून श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली वाडा पोलीस ठाणेचे तपास पथक तयार केले. सदर पथकाने गुन्ह्याचा तपास करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे देवघर गावातील इसम प्रणित ऊर्फ भुऱ्या ऊर्फ टोल्या सुनिल पाटील यांच्यावर पाळत ठेऊन तसेच त्याच्या हालचालींचे निरीक्षण केले असता त्याच्याकडे गावठी कट्टा असल्याची देखील खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्यानंतर त्याच्या राहत्या घराची झडती घेतली असता एक देशी बनावटीचा गावठी कट्टा (पिस्तुल) मिळुन आला. सदर गावठी कट्टयाबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा अग्नी शस्त्र परवाना नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर व्यक्तीला ताब्यात घेवून तपास केला असता त्याने व त्याचा साथीदार अजित ऊर्फ बाली प्रकाश पाटील मूळ गांव लखमापुर, ता. वाडा व सध्या रा. आंबिस्ते खुर्द, ता. वाडा, यांनी देवघर गाव व परिसरामध्ये चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्यास व त्याचा साथीदार अजित ऊर्फ बाली प्रकाश पाटील या दोघाना अटक केली असून त्यांच्यावर वर नमुद गुन्हा करण्यासाठी त्यांची साथीदार एका महिला असून तिने मदत केली असल्याचे कबुली त्यांनी दिली असता तिलाही नमुद गुन्हयाखाली अटक केली असून अटक आरोपीत यांचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेले २,१६,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत केले आहेत. अधिक तपासादरम्यान वरील आरोपीत यांनी वाडा पोलीस ठाणे आभिलेखावरील खालील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

१) गु.रजि.नं. १ २७/२०२५ भा. न्या. संहिता कलम ३०५,३३१ (४) प्रमाणे दाखल गुन्हयातील एकुण ९ तोळे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले आहेत

२) गु.रजि.नं. १२२/२०२६ भा. न्या. संहिता ३०५,३३१(३), ३ (५) प्रमाणे दाखल गुन्हयातील एकुण ४ तोळे किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले आहेत.

३) गु.रजि.नं. ए १३४/२०२६ भारतीय शख अधिनिमय कलम ३(२५) प्रमाणे दाखल गुन्हयात एक देशी बनावटीचा गावठी कट्टा (पिस्तुल) जप्त करण्यात आलेला आहे.

४) गु.रजि.नं. १०५/२०२५ भा. न्या. संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (१), ३३१ (३) प्रमाणे व गु. रजि.नं. १ २८४/२०२५ भा.न्या. संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (१), ३३१ (३) प्रमाणे हे दोन्ही गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोउपनि सागर मालकर व सपोउपनि दयानंद पाटील, नेमणुक वाडा पोलीस ठाणे हे करत आहे. सदरची कामगिरी ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अप्पर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. समिर मेहेर, उप विभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्तात्रय किंद्रे, पोलीस निरीक्षक, पोउपनिरी सागर मालकर, सपोउपनि/दयानंद पाटील, सपोउपनि/गुरुनाथ गोतारणे, पोहवा/विजय मढवी, पोशि/गजानन जाधव, पोशि/संतोष वाकचौरे, पोशि/चेतन सोनावणे, पोशि/सचिन भोये सर्व नेमणुक वाडा पोलीस ठाणे यांचे पथकाने केलेली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933